नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) चा आर्थिक अभ्यास : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा (2018-2024)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड मानव्य विद्याशाखे अंतर्गत “अर्थशास्त्र” विषयातील पी. एच. डी. पदवीसाठी सादर करावयाचा संशोधनपूर्व आराखडा

संशोधक

बसवंते विरेंद्र माधवराव

सामाजिक शास्त्रे संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मार्गदर्शक

डॉ. प्रा. विलास तुळशीराम ठाकूर

संशोधन मार्गदर्शक व विभाग प्रमुख अर्थशास्त्र

शिवाजी कॉलेज कंधार ता. कंधार जि. नांदेड

संशोधन केंद्र

सामाजिकशास्त्रे संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडाविद्यापीठ, नांदेड

सप्टेंबर 2022

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) चा आर्थिक अभ्यास : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा (2018-2024)

प्रस्तावना

प्राचीन कालीन इतिहास पाहताना आपल्याला असे समजते की, जगातील अनेक व्यवसायांपैकी कृषी व्यवसाय हा सर्वात प्राचीन व्यवसाय आहे. कारण अन्न, वस्त्र, व निवारा या प्राथमिक स्वरूपाच्या गरजा असल्यामुळे मानव जात वसाहत करून राहू लागल्यापासून त्यांना शेतीकडे विशेष लक्ष द्यावे लागले. आधुनिक काळात औद्योगीकरणाचा विस्तार व विकास मोठ्या प्रमाणात झाला असला तरी, आजही कृषी व्यवसाय हाच जगातील सर्वात मोठा व्यवसाय समजला जातो. कारण जगाच्या एकूण लोकसंख्या पैकी जवळजवळ 2/3 लोकांचे जीवन कृषीवर अवलंबून आहे. भारतीय अर्थव्यवस्था पूर्णपणे कृषीवर आधारित आहे, भारतीय अर्थव्यवस्थेत स्वातंत्र्यानंतर पहिलीच पंचवार्षिक योजना ही कृषीवर आधारित होती तेव्हापासून ते आज पर्यंत भारतामध्ये 32.87 कोटी हेक्टर भूभागापैकी 14.1 कोटी हेक्टर हे निव्वळ लागवडी खाली असून सुमारे 47 टक्के लोक हे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे कृषीवर अवलंबून आहे.

आर्थिक विकासात कृषी क्षेत्राची योगदान पाहिले असल्यास भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी 60 टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. त्यांचादेखील मुख्य व्यवसाय शेतीचा आहे. प्राचीन काळापासून कृषी स्वयंपूर्ण होती. ग्रामीण भागामध्ये असलेले कुटीर व लघुउद्योग हे प्रामुख्याने शेतीतील कच्च्या मालावर आधारित होते. ब्रिटिशांच्या कारखान्यांमध्ये अशा उद्योगाचा ऱ्हास झाला, त्यामुळे शेतीवर उपजीविका करणारी लोकसंख्या वाढली. भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे महत्त्व विचारात घेत असताना लोकांच्या उपजिवीकीचे प्रमुख साधन म्हणून शेती क्षेत्राकडे पाहिले जाते.

महाराष्ट्रातील 70 टक्के जनता शेतीवर आणि शेतीवर आधारित उद्योगावर अवलंबून आहे. आधुनिक प्रगत शेती विषयक ज्ञान सर्वसामान्य शतकापर्यंत पोहोचण्याचे कार्य शासनाचा कृषी विभाग करीत असतो. महाराष्ट्र शेती प्रगत मानली जात असली, तरी भौगोलिक परिस्थिती व लहरी हवामानामुळे शेतीचे एकूण सरासरी उत्पादन इतर राज्यांपेक्षा कमी आहे.

महाराष्ट्र हे भारतातील औद्योगिक प्रगत राज्य समजले जाते. राज्याच्या औद्योगिक आणि आर्थिक विकासात होत असतांनाही 2011 च्या जनगणनेनुसार कृषी व सलग्न कार्य या क्षेत्राचा राज्यातील एकूण

रोजगारांपैकी 52.7 टक्के वाटा आहे. महाराष्ट्राचे अर्थव्यवस्था कृषीप्रधान स्थूल राज्य असल्याने राज्य उत्पादनात शेतीचा वाटा महत्त्वाचा आहे. कृषी व संलग्न कार्य या क्षेत्राचा चालू किमतीनुसार 2012 ते 2013 उत्पन्नात 10.9 टक्के वाटा होता. एकेकाळी शेतीमध्ये देशात खालचा क्रमांक असलेले महाराष्ट्र राज्य वसंतराव नाईक यांनी राबविलेल्या कृषी धोरणामुळे देशातील आघाडीचे राज्य बनले. म्हणूनच वसंतराव नाईक यांना महाराष्ट्रात “हरितक्रांतीचे जनक” असे म्हणतात

या संशोधनाच्या अनुषंगाने पाहिल्यास नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प हे, पूर्वी Project on Climate Resilient Agriculture (PoCRA) नावाने ओळखत असे, मराठीत याचा अर्थ हवामान लवचिक शेती प्रकल्प (PoCRA) असा आहे. नंतर त्यांचे नामांतर महाराष्ट्र सरकारने नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) असे करण्यात आले. नानाजी देशमुख यांचे नाव देण्याचे कारण म्हणजे महाराष्ट्र सरकारने कै. चंडिकादास अमृतराव देशमुख उर्फ नानाजी देशमुख समाजसेवक आणि भारतातील विविध राज्यातील दुर्गम पहाडी गावातील शेतकऱ्यांना विविध प्रकल्पांच्या माध्यमातून आत्मनिर्भर व उद्यमशील बनविण्यामध्ये आपले जीवन समप्रतीत केले आहे. त्यांनी ग्रामविकास व लोकशिक्षण, गोवंश संवर्धन, पारंपारिक कृषी, पद्धतींचा विकास, कृषी सिंचन तसेच जलसंधारण माध्यमातून कृषी सिंचनाकडे वाढ करणे इत्यादी विविध समाज उपयोगी कामात भरवी योगदान दिले. श्री. नानाजी देशमुख यांनी केलेले निस्वार्थ समाजसेवा व त्यांचे कृषी क्षेत्रातील योगदान लक्षात घेऊन जागतिक बँक सहित हवामान अनुकूलित प्रकल्पास यापुढे नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (PoCRA) म्हणून समजण्यात येईल असे नाव महाराष्ट्र सरकारने या योजनेला देण्यात आले.

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा)

या योजनेचा लाभ राज्य शासनाच्या वतीने महाराष्ट्रातील लघु व मध्यमवर्गीय शेतकर्यांना देण्यात येतात. महाराष्ट्र सरकारने नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना २०२१ साठी ४००० कोटी रुपये खर्च करण्याच्या प्रस्तावला मंजूरी दिली आहे. ही योजना राज्यातील पाण्याच्या उपलब्धतेनुसार पिकांच्या लागवडीवर भर देईल आणि हवामान बदलांमुळे होणार्या अडचणींमध्ये शेतकर्यांना मदत होईल. राज्यातील ज्या शेतकर्यांना या योजनेचा लाभ घ्यायचा आहे, त्यांनी या योजनेअंतर्गत अर्ज करावा लागतो. महाराष्ट्रातील १५ जिल्ह्यातील ५१४२ खेड्यांमध्ये नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना २०२१ सुरू. करण्यात आलेली आहे.

नानाजी देशमुख कृषि संजीवनी योजना सुरू करण्यामागे सरकारचा उद्देश, लहरी हवामानामुळे राज्यातील शेतकरी सतत काही ना काही अडचणीत सापडतात, त्यातील मोठी समस्या म्हणजे शेतकऱ्याच्याशेतात पाणी नसल्यामुळे दुष्काळ आहे, आणि त्यामुळे शेतकरी शेती करण्यास असमर्थ आहेत आणि बरेच शेतकरी आत्महत्या करतात, या सर्व अडचणी लक्षात घेता महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्र नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना २०२१ सुरू केली आहे, या योजनेच्या माध्यमातून महाराष्ट्र शासन दुष्काळग्रस्त भागांना दुष्काळमुक्त करेल जेणेकरून शेतकऱ्यांना शेती करणे सहजसाध्य होईल. नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना २०२१ च्या माध्यमातून शेतकऱ्यांचे उत्पन्नही वाढेल आणि त्यांचे आयुष्यही सुधारेल.

नानाजी देशमुख कृषि संजीवनी योजनेचे लाभ व शेतकऱ्यांना मिळणारे फायदे, या योजनेंतर्गत राज्यातील लघु व मध्यमवर्गीय शेतकऱ्यांना फायदा होतो. नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना महाराष्ट्र २०२१ च्या माध्यमातून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यावरही लक्ष केंद्रित केले जाते. राज्य सरकारकडून या योजनेसाठी आवश्यक निधी पुरवठा करण्यात आला आहे. राज्याच्या अर्थसंकल्पात या योजनेसाठी सरकारकडून ४००० कोटी रुपयांचा निधी पुरवला गेला आहे. ही योजना सुरू करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने जागतिक बँकेकडून कर्जाच्या स्वरूपात सुमारे २८०० कोटी रुपयांची आर्थिक मदत घेतली आहे. नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना २०२१ च्या माध्यमातून प्रथम मातीची गुणवत्ता तपासली जाईल आणि शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून उत्पन्न वाढविण्यामध्ये सुधारणा होईल आणि शेती उत्पन्नात वाढ होईल. या योजनेच्या माध्यमातून महाराष्ट्र शासन राज्यातील दुष्काळग्रस्त भाग दुष्काळमुक्त करेल. ज्यामुळे दुष्काळाने घायकुतीला आलेला शेतकरी शेती करू शकतात.

नानाजी देशमुख कृषि संजीवनी योजनेंतर्गत राबविण्यात येणार प्रकल्प, बियाणे उत्पादन एकक,फॉर्म पोंडास अस्तर, तलावाचे शेतीकरण, शेळीपालन युनिट ऑपरेशन, लहान रवंथ करणारा प्रकल्प ,वर्मी कंपोस्ट युनिट,सिंचन प्रकल्प शिंपडा,ठिबक सिंचन प्रकल्प,पाण्याचा पंप,फलोत्पादन अंतर्गत वृक्षारोपण प्रकल्प.

नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेची अंमलबजावणी, नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेंतर्गत (Nanaji Dreshmukh Krishi Sanjivani Yojana 2021) राज्यातील सर्व दुष्काळग्रस्त भागात सरकारकडून पाहणी केली जाईल. या तपासणीनंतर सर्व महत्त्वपूर्ण माहिती गोळा केला जाईल.

यानंतर शेतकऱ्यांना राज्यातील पाणी व हवेनुसार शेती करण्याचा सल्ला देण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत लागवड केलेल्या जमिनीच्या मातीचेही परिक्षण केले जाणार आहे. ज्यामध्ये खनिजांची कमतरता आणि बॅक्टेरियाची कमतरता पूर्ण होईल. शेती करणे शक्य होणार नाही अशा सर्व क्षेत्रात शेळीपालन युनिट स्थापन केले जातील जेणेकरून शेतकऱ्यांना उत्पन्नाचा स्रोत राहील. तलावांचे उत्खनन व मत्स्यपालनाचे उद्योग उभारले जातील. सिंचनाच्या पाण्याची कमतरता असलेल्या सर्व ठिकाणी ठिबक सिंचन लागू केली जाईल.

नांदेड जिल्ह्यातील या प्रकल्पाच्या अंतर्गत येणारे 16 तालुक्यातील 384 गावांना या योजनेच्या अंतर्गत आणण्यात आलेले आहे. तसेच नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) चा आर्थिक अभ्यास : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा विषयाचे संशोधन करण्यासाठी संशोधन विषय निवडलेला आहे तसेच या संशोधनात प्रकल्पांचा सखोल अभ्यास करण्यात येईल.

संशोधन समस्या

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) चा आर्थिक अभ्यास : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा हा विषय संशोधनासाठी घेण्यात आलेला आहे. भारतातील बहुसंख्य लोकसंख्या आजही शेती व शेती निगडित व्यवसाय यावर अवलंबून आहे. असे असताना केंद्र व राज्य सरकार विविध योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारावी म्हणून प्रयत्नशील असते. असे असताना देखील भारतामध्ये शेती कर्जामुळे शेतीच्या वेगवेगळ्या कारणामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या दिसून येतात. कित्येक शेतकरी कर्जाच्या बोजाखाली, दारिद्र्यात, बेरोजगारी, दुष्काळग्रस्त परिस्थितीत, आज अडकलेला दिसून येतो. अशा परिस्थितीत बदल घडवून आणावा म्हणून केंद्र व राज्यशासन हे दोन्हीही प्रयत्नशील असतात. यासाठी स्वतंत्र कृषी विभागाची स्थापना करून गावापर्यंत प्रशासकीय कार्यालयाची निर्मिती केली आहे. कित्येक कृषी विषयक योजना आणल्या आहेत सरकार करोडो रुपये कृषीच्या विविध योजनांवर खर्च करत आहे. असे असताना देखील परिस्थितीमध्ये समान धारक बदल झालेला नाही. कृषी विभागात असणारा भ्रष्टाचार, अकार्यक्षमता, योजनेची अंमलबजावणी पारदर्शक, न करणे शेतकऱ्यांना योग्य ती माहिती न पुरवणी,इत्यादी समस्या दिसून येतात ही निश्चितच लाजवणारी गोष्ट आहे.

जागतिक बँकेच्या अर्थसाहाय्याने विदर्भ व मराठवाड्यातील पाच हजारावर गावांमध्ये राबविण्यात येणारा नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प मूळ उद्देशापासूनच भरकटला आहे. दुष्काळग्रस्त गावांमध्ये अनुकूल उपाययोजना करण्याऐवजी लाभार्थ्यांच्या वैयक्तिक लाभाच्या योजनांवर निधीचा अपव्यय करण्यात येत असल्याचे चित्र समोर आले. विशेष म्हणजे कृषी विभागाच्या अस्तित्वातील विविध योजनाच कृषी संजीवनीअंतर्गत पुन्हा राबविण्यात येत असल्याने या प्रकल्पाला नेमका उपयोग काय, असा प्रश्न उपस्थित होतो. मराठवाड्यात दुष्काळाचा सामना करावा लागतो. विदर्भ व मराठवाड्याची परिस्थिती वेगवेगळी असताना कृषी संजीवनी योजनेत सारख्यात उपाययोजना कशा? असा प्रश्नदेखील तज्ज्ञांकडून उपस्थित केला जातो.

विदर्भ व मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त व खारपाणपट्ट्यातील गावांमध्ये सहा वर्षांच्या कालावधीत जागतिक बँकेच्या अर्थसाहाय्याने नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प गत अडीच वर्षांपासून राबविण्यात येत आहे. पूर्वी याचे हवामान अनुकूल कृषी विकास प्रकल्प असे नाव होते. विदर्भ, मराठवाडा व नाशिक विभागातील १५ जिल्ह्यांतील हवामान बदलास अतिसंवेदनक्षम ठरणाऱ्या ४२१० गावे व पूर्णा नदीचे खोरे असलेल्या खारपाणपट्ट्यातील ९३२ गावे अशा एकूण ५१४२ गावांची प्रकल्पांतर्गत निवड करण्यात आली. या प्रकल्पासाठी जागतिक बँकेने सुमारे चार हजार कोटींची अर्थसाहाय्य करण्यात आले. जिल्हा व ग्राम स्तरावर समित्याही करण्यात आल्या. बदलत्या हवामानामुळे मोठ्या प्रमाणात दुष्परिणाम होत आहे. त्यामुळे अनेक गावांना सातत्याने दुष्काळाचा सामना करावा लागतो. त्याचा विपरीत परिणाम कृषी क्षेत्रावरही होऊन उत्पादनात झपाट्याने घट होते. खारपाणपट्ट्यात तर पिण्याच्या पाण्यासह कृषी सिंचनाची गंभीर समस्या आहे. त्यामुळे हवामान अनुकूलच्या बाबतीत अद्ययावत व तांत्रिकदृष्ट्या अभ्यास होऊन उपाययोजना करण्याच्या उद्देशाने हवामान अनुकूल कृषी विकास प्रकल्प आखण्यात आला. निधीसाठी याचा प्रस्ताव जागतिक बँकेकडे सादर करण्यात आला. हवामान बदल जागतिक स्तरावर चिंतेचा विषय असल्याने याचे गांभीर्य ओळखून त्याला मंजुरीही देण्यात आली. मात्र, हा प्रकल्प नानाजी देशमुख कृषी संजीवनी या नावाने राबवत असताना त्याच्या मूळ उद्देशापासूनच दूर गेल्याचे वास्तव समोर अंमलबजावणीत अनेक मुद्द्यांकडे दुर्लक्ष त्यात हवामानपूरक सौरऊर्जेचा वापर, अभ्यास तथा संशोधन केंद्र, जनजागृतीसाठी तज्ज्ञांची परिषद, हवामान अनुकूल कृषी पद्धतीस प्रोत्साहन, सहभागीय पद्धतीने गाव समूहाचा नियोजन आराखडा, कार्यक्षमता वृद्धिंगत करणे, सीड हबसाठी पायाभूत सुविधांची निर्मिती, महाराष्ट्र राज्य कृती आराखडा, पीक पद्धतीत बदल, हवामान अनुकूल वाण, जमिनीतील ओलाव्याचे जतन आदींसह अनेक मुद्द्यांकडे प्रकल्पात

दुर्लक्ष होत असल्याचे कृषीतज्ज्ञांचे मत आहे. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पामध्ये ठोस उपाययोजना करण्यात आल्या नाहीत. सरकारच्या केवळ पोकळ घोषणा आहेत. प्रत्यक्षात शेतकऱ्यांना फायदा होत नाही. निधीचा अपव्यय केला जातो. यात प्रामुख्याने नांदेड जिल्हा कृषी विकास बाबतीत मागासलेला का आहे, नांदेड जिल्ह्यामध्ये नानाजी देशमुख कृषी संजीवनी पोकरा चा आर्थिक अभ्यास विशेष संदर्भ नांदेड जिल्हा हा विषय संशोधनासाठी घेण्यात आला आहे.यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनांचा आर्थिक अभ्यास केला जाणार आहे.

संशोधनाचे महत्व

भारत हा कृषिप्रधान देश आहे 21 व्या शतकातही येथील बहुसंख्य लोक शेती व शेतीवर आधारित उद्योग यामध्ये गुंतलेले दिसतात. आजही त्यांच्या रोजी रोटीचा प्रश्न हा शेतीतूनच सुटत असतो. म्हणून कृषी हा व्यवसाय भारताच्या दृष्टीने खूप महत्वपुर्णआहे. हा विषय बघताना त्यामध्ये नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प पोकरा : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा हा विषय संशोधनासाठीमहत्वपुर्ण ठरणार आहे.

आपल्याला दिसून येते की मराठवाडा भागातील नांदेड जिल्हा जो विकास च्या बाबतीत आजही म्हणावा तेवढा प्रगतशील नाही. दारिद्र्य, बेरोजगारी, भूकमारी, दुष्काळग्रस्त परिस्थिती आजही या भागात खूप मोठ्या प्रमाणावर दिसून येते. म्हणून या सर्व गोष्टीचा विचार केला असता हा विषय नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) चा आर्थिक अभ्यास : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा संशोधनासाठी महत्वपुर्णआहे.

संशोधनाची उद्दिष्टे

1) नानाजी देशमुख कृषी संजीवनी (पोकरा) योजनांची सखोल माहिती घेणे.

2) प्रकल्पाच्या अंतर्गत अर्थ पुरवठा वितरण प्रणालीचा अभ्यास करणे.

3) शेतकऱ्यांच्या आर्थिक विकास करून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना व उपायांचा शोध घेणे.

4) प्रकल्पाचे महत्व व समस्या यांचा सविस्तर आढावा घेणे.

5) नानाजी देशमुख कृषी संजीवनी पोकरा योजनेची माहिती शेतकऱ्यापर्यंत पोहोचतात का ? यांचा आढावा घेणे.

6) नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना व कार्य प्रणाली विषयी शेतकऱ्यांचे मत जाणून घेऊन शेती सुधारणेत योजनेची भूमिका जाणून घेणे.

गृहीतके

1) नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेचा लाभ मध्यम व जमीनदार शेतकऱ्यांना अधिक होत असून या योजनांची अंमलबजावणी पारदर्शकपणे होत नाही.

2) उत्पादन खर्चाच्या तुलनेत शेतीमालाला योग्य भाव मिळत नसून दलाल व व्यापारी जास्त फायदा घेत असून शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा वाढलेला आहे.

3) या प्रकल्पाच्या अंतर्गत विविध उपक्रमाची माहिती शेतकऱ्यापर्यंत पोहोचत नाही.

4) प्रकल्पाच्या अंतर्गत शेतकऱ्यांना त्यांच्या अपेक्षा पेक्षा कमी आर्थिक पुरवठा होत आहे.

संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम सामग्री च्या आधारे संकलित करण्यात येणार आहे

अ)प्राथमिक सामग्री

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) चा आर्थिक अभ्यास : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा या विषयासाठी प्रश्नावली, मुलाखती, अनुसूची, निरीक्षण, सर्वेक्षण, या पद्धतीचा वापर माहिती संकलित करण्याकरिता करण्यात येणार आहे.

ब) दुय्यम सामग्री

प्रस्तुत संशोधनासाठी लागणारी माहिती संदर्भ ग्रंथ, मासिके ,साप्ताहिके ,वृत्तपत्रे ,शोधनिबंध, इंटरनेट, विविध अप्रकाशित साहित्य, इत्यादी दुय्यम सामग्रीचा वापर करण्यात येणार आहे

नमुना निवड

या संशोधनासाठी सहेतुक नमुना निवड या पद्धतीचा वापर करण्यात येणार असून यासाठी कंधार, भोकर, किनवट, नायगाव, या शहरांची निवड करण्यात आली असून या शहरातील असे प्रत्येक शहरातून $200 \times 4 = 800$ एवढे नमुना घेण्यात येणार आहेत नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) चा आर्थिक अभ्यास विषय संदर्भ नांदेड जिल्हा फळबाग लागवड, गांडूळ खत आणि नाडे पद्धतीने सेंद्रिय निविष्ठा उत्पादन, वैयक्तिक शेततळे, विहीर योजना, गोड्या पाण्यातील मत्स्यपालन, बीजोत्पादन या प्रत्येक योजनेतून $50 \times 4 = 200$ नमुना निवड अशा प्रकारचे असेल.

संशोधन तंत्र

माहितीचे विश्लेषण करण्यासाठी सरासरी, टक्केवारी, मध्यमान,सहसंबंध,आलेख, इत्यादी सांख्यिकीय साधनाचा वापर करण्यात येणार आहे.

संशोधनाची व्याप्ती

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) चा आर्थिक अभ्यास : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा अभ्यास करण्यात येणार आहे, या प्रकल्पाचा नांदेड जिल्ह्यातील परिणाम प्रक्रियेमुळे काय परिणाम झाली आहे त्यादृष्टीने संशोधनाची व्याप्ती असेल.

संशोधन अभ्यासाची मर्यादा

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) चा आर्थिक अभ्यास : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा निवडण्यात आलेल्या आधारभूत संरचनेच्या निर्धारक घटकांच्या संदर्भातच समित असल्यामुळे अभ्यासात प्राप्त झालेल्या निष्कर्ष हे कार्यक्षेत्र कालमर्यादा व निष्कर्षांच्या संदर्भात लागू पडणारे आहे. अभ्यासात समावेश नसलेल्या कार्यक्षेत्र कालमर्यादा व निष्कर्ष संदर्भात ते तंतोतंत लागू पडतातच असे नाही.

प्रकरणाची रूपरेषा

1) प्रस्तावना

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) चा आर्थिक अभ्यास : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा यांचा अभ्यास तसेच संशोधन पद्धती उद्दिष्टे इत्यादी बाबींचा या प्रकरणात समावेश असेल.

2) संशोधन साहित्याचा आढावा

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) चा आर्थिक अभ्यास : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा यांचा अभ्यास परिणामांचा अभ्यास संशोधकांनी केलेल्या अभ्यासाचा आढावा घेण्यात येणार आहे यामध्ये विविध लेखकांनी लिहिलेले ग्रंथ, वर्तमान पत्रातील लेख, संशोधकांनी लिहलेले शोध निबंध , प्रबंध आदीचा समावेश केला.

3) ननाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या अंतर्गत येणारे घटक आणि विविध योजनांचा आढावा

महाराष्ट्राच्या पोकरा अंतर्गत विविध योजना व त्यांच्या कोणत्या व कशा प्रमाणात उपरेषा आहेत याचा या प्रकरणात समावेश असेल

4) नांदेड जिल्ह्यातील अल्पभूधारक व मध्यमभूधारक शेतकऱ्यांचा आर्थिक राहणीमाचा अभ्यास

या प्रकरणात नांदेड जिल्ह्यातील एकूण लोकसंख्या त्यांची भौगोलिक स्थान तसेच नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अंतर्गत नांदेड मधील एकूण समावेश असलेले तालुके व गावांचा अभ्यास

5) निष्कर्ष व शिफारशी

अभ्यासाअंती प्राप्त निष्कर्ष व त्या अनुषंगाने शिफारशी प्रस्तुत प्रकरणात येणार आहेत

संदर्भ

1) डॉ. चव्हाण एन. एल. वर्ष 2015 'भारतीय अर्थव्यवस्था-1' प्रशांत पब्लिकेशन जळगाव पृष्ठ क्र. 173

2) चिखले नंदकिशोर, डॉ. राऊत नरेंद्र, एप्रिल 2015 वर्ष 16, वसंतराव नाईक; महाराष्ट्राच्या कृषी समृद्धीचे नायक " अंक 02 पृष्ठ क्र. 07

3) डॉ. साबळे रामचंद्र (सप्टेंबर 2010) '50 वर्षातील बदलती शेती', लोकराज्य, अंक 07, पृष्ठ क्र. 12 -14

4) डॉ. कानेटकर मेधा, (जुलै 2012) 'भारतीय अर्थशास्त्र' श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर

5) मिश्र जे.पी.,'कृषी अर्थशास्त्र',2008 , साहित्य भवन पब्लिकेशन आग्रा.

6) प्रा. डॉ. ,साळुंखे माणिकराव, ऑक्टोबर 2001, 'कृषी व्यवसाय व्यवस्थापन भाग -1 पाठ्यपुस्तिका यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ', नाशिक.

7) 'महाराष्ट्र टाइम्स न्यूज पेपर', मार्च 2022 'विशेष लेख प्रकाशित'

8) ऑफिशियल वेबसाईट, https.//dbt.mahapocra.gov.in, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प कृषी विभाग महाराष्ट्र शासन,.

9) डॉ. जंगले मंगला, (वर्ष 2103) 'महाराष्ट्राची अर्थव्यवस्था', प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव